# हळुवार प्रेमगीतांच्या सप्तरंगी छटा

**चित्रपटगीतांत हळुवार प्रेम भावना व्यक्त करणाऱ्या प्रेमगीतांची अजिबात उणीव नाही. वर्षानुवर्षं जी गीतं लोकांच्या मनात रेंगाळताय, ज्यांच्या निर्मितीचा खास इतिहास आहे अशा निवडक प्रेमगीतांचा हा रंजक आढावा.**

□ अजित पोपट


फेब्रुवारी महिन्याची प्रेमीजनांना मोठ्या आतुरतेने प्रतीक्षा असते. कारण या महिन्याच्या १४ तारखेला व्हॅलेंटाईन डे साजरा केला जातो. पाश्चिमात्यांच्या ज्या काही चालीरीती आपण भारतीयांनी आपल्याशा केल्या आहेत त्यापैकी एक हा प्रेमीजनांचा प्रेमाची कबुली देणारा खास दिवस. या दिवशी मनातल्या एका कोपऱ्यात जपून ठेवलेली प्रेमाची नाजुक भावना हळवेपणाने समोरच्याकडे व्यक्त करायची नामी संधी असते. प्रेमाची कबुली, विरह, रुसवे-फुगवे या सगळ्या गोष्टी यात आल्या... हिंदी चित्रपटांत तर गेल्या ५०-६० वर्षांत सर्वाधिक प्रेमगीतं लिहिली गेली असतील. मग ते सायगल युग असो नाहीतर दिलीपकुमार - देव आनंद आणि राज कपूरचा काळ. एकीकडे मान कलती ठेवून नाचणारा राजेश खन्ना असो नाहीतर अँग्री यंग मॅन, मिलेनियम स्टार अमिताभ बच्चन! सगळ्यांवर हमखास चित्रित झाली ती प्रेमगीतं. गेल्या पन्नास वर्षांतली सगळी गीतं इथे विचारात घेणं तर शक्य नाही. त्यातल्या त्यात खास, अविस्मरणीय ठरलेली आणि प्रेमीजनांना आपल्या भावना व्यक्त करताना मदतरूप ठरणारी ही काही मोजकी प्रेमगीतं आपण विचारात घेणार आहोत.

सुरुवात करू या प्रेमगीतांमधील चिंतनाने. उर्दू गझलांमध्ये इश्के हकीकी (दिव्य प्रेम) आणि इश्के मिजाजी (सांसारिक प्रेम) असे प्रेमाचे दोन प्रकार आहेत. हिंदी चित्रपट गीतं लिहिणारे गीतकार असे हुशार आहेत की त्यांनी या दोन्ही प्रकारात बसतील अशी गीतरचना केली. तुम्ही संसारी असाल तर त्या अर्थाने गीत गा, आणि परमेश्वराचे भक्त असाल तर त्या गीतातल्या भावार्थाचा विचार करा. अशा काही गीतांचा आपण आता विचार करू या.

'यह इश्क इश्क है इश्क इश्क...' चित्रपट *बरसात की रात* (१९६०) ची अविस्मरणीय कव्वाली 'ना तो कारवां की तलाश है... 'चा दुसरा भाग; त्यातल्या एका अंतऱ्यात तर शायर कमाल करतो.

दिल इश्क, जिस्म इश्क है
और जान इश्क है
इमान की जो पूछो तो इमान इश्क है
मेरा इश्क है तेरी आरजू,
मेरा इश्क है तेरी आबरु...

कव्वालीच्या दुसऱ्या भागात परमेश्वराचा ज्या प्रकारे हवाला दिला आहे तो नंतरच्या कोणत्याही गीतांमध्ये खचितच पाहायला मिळतो. के.





आसिफच्या *मुगल-ए-आझम*मध्ये दोन-तीन प्रेमगीतं आहेत. ती सगळीच उत्तम आहेत. पण *बरसात की रात*ची उंची एकाही गीताला गाठता आलेली नाही. *मुगल-ए-आझम*मध्ये राजपुत्र सलीमला मृत्यूची सजा सुनावण्यात येते तेव्हा सगळी प्रजा आपल्या लाडक्या राजपुत्राचं अखेरचं दर्शन घेण्यासाठी राजवाड्याबाहेर जमते. त्यावेळी चरित्र अभिनेता कुमार याच्या तोंडी एक सुंदर गीत आहे.

जिंदाबाद जिंदाबाद
ये मुहब्बत जिंदाबाद
दौलत की जंजीरों से भी
रहती है आजाद...

महंमद रफीने खड्या आवाजात म्हटलेलं हे गाणं पडद्यावर पाहताना एका वेगळ्याच भावनेने आपल्या मनाचा ताबा घेतल्याचं जाणवतं. आता काय होणार अशी उत्सुकता क्षणोक्षणी वाढत जाते. याच चित्रपटातलं एक गीत- 'प्यार किया तो डरना क्या...'मध्ये सांसारिक भाव असल्याचं वेगळं सांगायला नको. याच गाण्यातले हे शब्द पहा–

छूप ना सकेगा इश्क हमारा
चारों तरफ है उनका नजारा...
परदा नहीं जब कोई खुदा से
बंदों से परदा करना क्या...

ज्याला चिंतनपर प्रेमगीत म्हणता येईल असं एक गाणं श्रीधरच्या *दिल एक मंदिर है* चित्रपटात आहे. या चित्रपटाचा शेवट श्रीधरने वेगळा ठरवला होता. राम (राजकुमार) चं ऑपरेशन यशस्वी झालं असल्याची बातमी त्याची पत्नी सीता (मीनाकुमारी) ला सांगण्यासाठी आलेला डॉक्टर धर्मेश (राजेंद्रकुमार) जिन्यावरून पडतो आणि मरतो असा शेवट ठरवला होता.

मीनाकुमारी स्वतः चांगली शायर होती, लेखिका होती. तिने श्रीधरबरोबर चर्चा केली की इथे धर्मेश फक्त एक डॉक्टरच नाही तर खरा प्रेमीही आहे. प्रेम म्हणजे त्याग, बलिदान. त्यामुळे त्याला नैसर्गिक मृत्यू येणंच दर्शकांच्या पचनी पडेल. श्रीधरलाही तिचं म्हणणं पटलं आणि त्याने त्या ठिकाणी एक गीत वाढवलं– 'जानेवाले कभी नही आते, जानेवाले की याद आती है, दिल एक मंदिर है, प्यार की जिस में होती है पूजा ये प्रीतम का घर है...'

हर धडकन है आरती अर्चन
आंख जो मींची हो गई दर्शन
सांसों का हर तार पुकारे यह प्रेमनगर है

याचा शेवट थोडा लांबला. मृत धर्मेशची आई राम-सीता यांना मुलगा-सून मानते आणि ते तिघे मिळून धर्मेशच्या फोटोला हार घालतात.

*मुघल-ए-आझम*मधील 'मुहब्बत जिंदाबाद...' गाण्याप्रमाणे इथेही महंमद रफीच्या टीपेच्या आवाजामुळे गाणं परिणामकारक झालं आहे.

'दिल एक मंदिर है...' सारखंच एक गीत दिग्दर्शक भीम सिंग यांच्या *खानदान* (१९६५) मध्ये होतं. 'तुम्हीं मेरे मंदिर तुम्ही मेरी पूजा, तुम्ही देवता हो...' या गीतात प्रेम शब्द उघडपणे वापरला नव्हता तरीही हे गाणं संवेदनशील बनलं होतं.

प्रेमाची आणखी एक छटा आहे ती प्रतीक्षेची. प्रियकर किंवा प्रेयसी कधी येणार याची प्रतीक्षा असते. अशा प्रतीक्षा गीतात एक गाणं फार

वेगळं आहे. महंमद रफीने गायलेलं हे गीत– 'सुहानी रात ढल चूकी न जाने तुम कब आओगे...?' या गाण्यात ट्रम्पेटप्रमाणे वाजणारं वाद्य रामप्रसाद शर्मा यांनी वाजवलंय. हे नाव तुम्हाला अपरिचित वाटेल, पण हिंदी चित्रपट गीतांत त्यांचं योगदान फार मोठं आहे.

सुमारे ६० वर्षांपूर्वी चित्रपट संगीतासाठी इंग्रजी नोटेशन पद्धत वाचण्यात गोवेकरांचं वर्चस्व होतं. मराठी, गुजराती किंवा अन्य भाषिकांना हे लोक पुढे येऊ देत नसत आणि संगीतकारांनाही आपल्या वर्चस्वाखाली ठेवत. रामप्रसादजी ब्रिटीश सैन्याच्या बँडमध्ये होते. त्यामुळे त्यांना नोटेशन पद्धत चांगली अवगत होती. १७३४-३५ च्या दरम्यान ते मुंबईला आले तेव्हा चित्रपट जगतातील संगीतकारांची कुचंबणा पाहून आश्चर्यचकित झाले. मग त्यांनी रस्त्यावरची मुलं पकडून, पदरमोड करून त्यांना संगीत शिकवलं. आजचे हिंदी, मराठी, गुजराती भाषिक साजिंदे रामप्रसादजींचे ऋणी आहेत. हे रामप्रसादजी म्हणजे दुसरे-तिसरे कोणी नसून संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल जोडीतील प्यारेलाल यांचे वडील. 'सुहानी रात ढल चूकी...'मध्ये त्यांचे ट्रम्पेट ऐकून त्याकाळी शंभर रुपये इनाम दिलं होतं.



*मुगल-ए-आझम*मध्ये अनारकलीच्या भूमिकेत मधुबाला

आणि हो, रफीच्या आवाजातील हे विरह गीत पापुआ न्यू गीआना नावाच्या छोट्या देशाच्या राष्ट्रगीतांत जाऊन बसलं. प्रियकराची प्रतीक्षा करणाऱ्या गाण्यात राज कपूरच्या गीतांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. शंकर-जयकिशन जयकिशनने संगीतबद्ध केलेलं...

जिया बेकरार है आई बहार है
आजा मोरे बालमा तेरा इंतजार है...

हे गाणं विसरू म्हणता विसरता येणार नाही. या विरह गीतातही एकप्रकारचा जिवंतपणा आहे. याचं कारण राज कपूर. त्याने शंकर-जयकिशनना सूचना दिली होती की आर.के. बॅनर्सच्या गीतांमध्ये तरुणांना आकर्षित करण्याची क्षमता असायला हवी. म्हणूनच जयकिशनने आपल्या पोतडीत वर्षानुवर्षं पडून राहिलेली एक धून राजेंद्रकुमार-साधनाच्या *आरजू*मध्ये वापरली. 'बेदर्दी बालमा तुझको मेरा मन याद करता है. बरसता है जो आंखों से वो सावन याद करता है...' हीच ती मनाचा ठाव घेणारी धून.

१९५०-६०च्या दशकात रोमँटिक हीरो म्हणून गाजलेला देव आनंद आणि आशा पारेख यांच्या *जब प्यार किसीसे होता है*मधलं शंकर-जयकिशनने संगीतबद्ध केलेलं 'सौ साल पहले मुझे तुमसे प्यार था, आज भी है और कल भी रहेगा...' हे गीत ऐकून शम्मी कपूरने दिलेली दाद बोलकी होती. या गाण्यात बोल आणि चाल यांचं सुरेख समीकरण जमलं. या गाण्यासाठी संगीतकारांनी सात चाली तयार केल्या होत्या. पण एकमताने हीच चाल मान्य झाली. उरलेल्या चालींपैकी एक चाल जयकिशनने देव आनंदच्या सूचनेवरून एका गीतासाठी वापरली. ते गाणं

जिया हो जिया हो जिया कुछ बोल दो
अरे ओ दिल का परदा खोल दो
जब प्यार किसी से होता है
इक दर्द सा दिल में होता है...

संगीताची जाण असलेल्यांना ही दोन्ही गीतं एकाच रागातली आहेत हे वेगळं सांगायला नको.

एखादा गीतकार शंभर वर्षांचं वचन देतो तर कोणी शंभर जन्माचं. *उस्तादों के उस्ताद* (१९६३) मधील असद भोपाली यांच्या या गीताला रवीने सुंदर चाल दिली होती–

सौ बार जनम लेंगे
सौ बार फना होंगे
ऐ जाने वफा फिर भी
हम तुम न जुदा होंगे...

देव आनंदसाठी गीतकाराने शंभर वर्षांचं अनुभवी प्रेम लिहिलं तर नूतन-सुनील दत्तच्या मिलन (१९६७) मध्ये तर युगानुयुगांची वचनं होती. गाण्याचे बोल होते–

हमतुम, युग युग से ये गीत
मिलन के गाते रहे हैं गाते रहेंगे... हा लांबलचक मुखडा लक्ष्मीकांत प्यारेलालनी अत्यंत खुबीने संगीतबद्ध केला. मुकेशच्या आवाजातील आणखी एक मिलन गीत–

गाये जा गीत मिलन के
तू अपनी लगन के
सजन घर जाना है...

विसरून कसं चालेल. मुकेशच्या आवाजातली नजाकत गाण्याचा प्रभाव वाढवणारी होती.

प्रणयगीतांतला आणखी एक प्रकार आहे तो रुसवे-फुगवे काढण्याचा. सितारवादक पं. रविशंकरनी अनुराधा (१९६०) चित्रपटासाठी भैरवी रागात दिलेलं हे गीत–

सांवरे सांवरे, काहे मोंसे करो जोराजोरी
बैयां ना मरोडो मोरी,
दूंगी दूंगी गारी हटो जाओजी सांवरे... त्याकाळी चांगलंच लोकप्रिय झालं होतं. त्यानंतर याच कल्पनेवर आधारित कितीतरी गीतं हिंदी चित्रपटात आली. पण पुढे पुढे ती छछोर होत गेली. त्यातल्या त्यात *ॲन इव्हनिंग इन पॅरिस* (१९६७) मधलं शर्मिला टागोर-शम्मी कपूरवर चित्रित या गाण्याची हाताळणी जरा वेगळी होती–

आसमान से आया फरिश्ता
'प्यार का सबक सिखला ने...' गाणं आठवा. यात नायक आर्जव करतो, 'कहो प्यार है तुमसे...' आणि नायिका त्याला लाडिक नकार देते, 'जा... जा...' असंच एक गाणं *संगम* (१९६५) मध्ये आहे, 'बोल राधा बोल संगम होगा के नहीं...'आणि नायिका म्हणते, 'नही, नही, नही.'

अशी हजारो उदाहरणं देता येतील. सायगलच्या काळातलं ('जब दिल ही टूट गया हम जी के क्या करेंगे...') पासून बाली ब्रम्हभट्टच्या ('उसने बोला केम छे, केम छे...') पर्यंत प्रेमगीतं हजारो आहेत. कारण प्रेमाला आणि ते व्यक्त करण्याच्या पद्धतीला अंत नाही. खास व्हॅलेंटाइन डे च्या निमित्ताने आजच्या प्रेमीजनांना निवडक प्रेमगीतांचा हा छोटासा नजराणा होता. ●